ऑस्ट्रेलियाची मजबूत पकड

ॲडिलेड कसोटी दुसरा दिवस: भारत पराभवाच्या छायेत

ॲडिलेड । वृत्तसंस्था

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघांमध्ये ॲडिलेड ओव्हल स्टेडियमवर सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलिया संघाने पहिल्या डावात सर्वबाद ३३७ धावा केल्या असून,१५७ धावांची आघाडी मिळवली आहे.

ऑस्ट्रेलिया संघाकडून ट्रॅव्हीस हेडने शानदार कसोटी क्रिकेटमधील त्याचे ८ वे शतक ठरले.तसेच मारनस लबुशेनने सर्वाधिक ६४ धावा केल्या. त्यामुळे ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाला पहिल्या डावात १५७ धावांची आघाडी मिळाली. भारताकडून अनुभवी गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि महंमद सिराजने ४-४ गडी बाद केले. तर आर अश्विन आणि नितीश कुमार रेड्डीने १-१ गडी बाद केला. ट्रॅव्हिस हेडने ४ षटकार आणि १७ चौकारांसह १४० धावा केल्या. हेड आणि लबुशेन व्यतिरिक्त ऑस्ट्रेलिया संघाच्या इतर सर्व फलंदाजांनी चांगली सुरूवात केली. मात्र भारतीय संघाच्या गोलंदाजांनी त्यांना मोठी खेळी साकारू दिली नाही.

ऑस्ट्रेलिया संघाकडून नॅथन मॅक्सविनी ३९, उस्मान ख्वाजा १३, मिचेल मार्श ९, लेक्स कॅरी १५ धावा केल्या.

ऑस्ट्रेलिया संघाने घेतलेल्या १५७ धावांच्या मजबूत आघाडीला पार करून लक्ष्य सेट करण्याचे भारतीय संघासमोर आव्हान असणार आहे.१५७ धावांच्या आघाडीला प्रत्युत्तर देण्याच्या इराद्याने यशस्वी जैस्वाल आणि के एल राहुल ही सलामी जोडी मैदानावर उतरली. मात्र मिचेल स्टार्कच्या पहिल्या षटकांत चौकार खेचून यशस्वी जैस्वालने भारताचे खाते उघडले. के एल राहुलने चौकार खेचून दुसऱ्या डावाची सुरुवात केली. मात्र धावफलकावर १२ धावा झालेल्या असताना पॅट कमिन्सने

के एल राहुलला लेक्स केरीकडे झेलबाद करत भारताला पहिला धक्का दिला. यशस्वी जैस्वालने शुभमन गिलसोबत भारताची धावसंख्या पुढे नेली. पण २४ धावा काढून तो माघारी परतला. स्कॉट बोलंडने त्याला केरीकडे झेलबाद करत भारताला दु-सरा धक्का दिला. शुभमन गिलने विराट कोहली सोबत भागीदारी रचून धावसंख्या पुढे नेली. मात्र स्कॉट बोलंडने विराट कोहलीला ११ धावांवर लेक्स केरी कडे झेलबाद केले.आणि भारताला तिसरा धक्का दिला. त्यानंतर मिचेल स्टार्कने शुभमन गिलला त्रिफळाचित केले. त्यानंतर रिषभ पंतची साथ देण्यासाठी कर्णधार रोहित शर्मा आला मात्र मिचेल स्टार्कच्या चेंडूवर पायचीत झाला. पंचांनी त्याला बाद ठरवले. पण नो बॉल असल्यामुळे त्याला एक जीवदान मिळाले. पॅट कमिन्सने त्रिफळाचित करत ६ धावांवर रोहित शर्माला बाद केले. रिषभने नितीश कुमार रेड्डी सोबत भागीदारी रचून डाव सावरला.

दिवसाचा खेळ थांबला तेव्हा रिषभ पंत २८ आणि नितीश कुमार रेड्डी १५ धावांवर खेळत होते. भारतीय संघ अजून २९ धावांनी पिछाडीवर आहे.

सहकारी संस्थांना मतदार याद्या सादर करण्यास मुदत

नाशिक । नाशिक जिल्ह्यात २०८० 'ड' वर्गातील सहकारी संस्था निवडणुकीस पात्र होत्या. त्यापैकी ७६४ सहकारी संस्थाच्या निवडणूक पूर्ण झाल्या आहेत. तर १११४ सहकारी संस्थांच्या निवडणुका बाकी आ-हेत. त्यापैकी ४१६ 'ड' वर्गातील सहकारी संस्थांनी मतदार याद्या सादर केलेल्या आ-हेत. अद्यापही ६९८ 'ड' वर्गातील सहकारी सहकारी संस्थांनी प्रारुप मतदार याद्या निबंधक कार्यालयाकडे सादर केलेल्या नसून, त्यांना मतदार यादी सादर करण्यासाठी एक आठवड्याचा वेळ देण्यात आलेला आहे. सदर मुदतीत या ६९८ संस्थांनी प्रारुप मतदार याद्या सादर न केल्यास त्यांना अवसायनात घेण्याची कार्यवाही संबंधीत निबंधक यांनी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

मजूर संस्था, पाणीवापर संस्था, उपसा जलसिंचन संस्था, बहुउद्देशिय व स्वंय: रोजगार संस्था, औद्योगिक, प्रक्रिया, दुग्ध, मत्स्य, पशुधन इत्यादी संस्थाचा समावेश निवडणुकीसाठी 'ड' वर्गात मोडणाऱ्या संस्थांमध्ये आहे. 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाची निवडणुकीसाठी संबंधीत संस्थाकडून मतदार यादी प्राप्त झाल्यानंतर निबंधक कार्यालयाकडून ती प्रसिध्द करण्यात येते, यादीवरील हरकती विचारात घेतल्यानंतर यादी अंतिम करण्यात येते, मतदार यादी अंतिम झाल्यानंतर प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. त्यानंतर संस्थेच्या प्राधिकृत अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीत संचालक मंडळाची निवड ०५ वर्षासाठी केली जाते.

मध्यंतरी निवडणुकांना असलेल्या स्थगितीमुळे या संस्थांच्या निवडणुका प्रलंबित होत्या. विधानसभा निवडणूक सुरु होण्यापूर्वी शासनाने सहकारी संस्थांच्या निवडणुकांना स्थगिती दिलेली आहे. परंतु त्यानंतर शासनाने 'ड' वर्गातील संस्थांची सभासद संख्या कमी असल्याने आणि सदर निवडणूक ही अधिमंडळाच्या बैठकीत होत असल्याने 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूक घेण्यास परवानगी दिलेली आहे. विधानसभा निवडणूक कामकाजातून सहकार खात्यातील अधिकारी परतल्यानंतर या कामास प्रथमप्राधान्य दिलेले आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे आयुक्त अनिल कवडे यांनी शुक्रवारी नाशिक येथे नाशिक विभागातील सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत निवडणुकी बाबतचा आढावा घेताना 'ड' वर्गातील संस्थांच्या मतदार याद्या एक आठवड्यात प्राप्त न झाल्यास सदर संस्था अवसायनात घेण्याचे निर्देश देऊन ड वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुका मिशन मोडवर पूर्ण करण्याबाबत आदेशित केलेले आहे.

गुरु गोविंदसिंग फाऊंडेशनच्या प्रांगणात 'नो युवर आर्मी'

नाशिक । भारतीय सैन्य दलाच्या ५५व्या विजय दिवसानिमित्त नाशिकच्या आर्टिलरी सेंटर आणि गुरु गोविंदसिंग फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'नो युवर आर्मी' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन शहराचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या हस्ते झाले. यावेळी ब्रिगेडियर आशीष भारद्वाज, गुरु गोविंद सिंग फाऊंडेशनचे अध्यक्ष बलबीर सिंग छाब्रा यांसह सह सैन्यदल, पोलिस दलाचे अधिकारी, फाऊंडेशनचे सर्व सदस्य, प्राचार्य, शिक्षक-कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रदर्शनात धनुष, पिनाका रॉकेट लाँचर सिस्टिम, १०५ एमएम मोटर गन आदी पाहायला मिळाले. तसेच शत्रूंवर नजर ठेवणारी आधुनिक यंत्रणा, रडार कसे कार्यरत असतात याचेही प्रात्यक्षिक सामान्य नागरिकांना, विद्यार्थ्यांना पाहायला मिळाले.

आशिया चषक स्पर्धेत भारत-बांगलादेश आज भिडणार

दुबई । १९ वर्षांखालील पुरुषांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय संघाचा सामना बांगलादेश संघाशी होणार आहे. भारतीय वेळेनुसार सकाळी १०:३० वाजता सामना खेळविण्यात येणार आहे. भारतीय संघाची धुरा मोहंम्मद अमानकडे तर बांगलादेश संघाचे कर्णधारपद अझिझूल हकिम तमीमकडे असणार आहे. भारतीय क्रिकेट संघाने मोहंम्मद अमानच्या नेतृत्वात आशिया चषक क्रिकेट स्पर्धेमध्ये सलामी लढतीत पाकिस्तान विरुद्ध ४३ धावांनी पराभव पत्करावा लागल्यानंतर जपान, युएई, श्रीलंकेविरुद्ध शानदार विजय संपादन केला आहे. आता अंतिम सामन्यात बांगलादेश संघाला पराभूत करून आशिया चषक क्रिकेट स्पर्धेचे नववे विजेतेपद मिळवून इतिहास रचण्याची संधी भारतीय संघाकडे असणार आहे.

हा सामना दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर आज खेळविण्यात येणार आहे. साखळी फेरीमध्ये दोन्ही संघांनी ३ पैकी २ सामन्यात विजय संपादन करून ४ गुणांची कमाई करत गुणतालिकेत दुसरे स्थान निश्चित केले होते.विशेष म्हणजे बांगलादेश संघाने २०२३ मध्ये खेळविण्यात आलेल्या अंतिम सामन्यात युएई विरूध्द विजय संपादन करून विजेतेपद पटकावले होते.

'अशोका मेडिकव्हर'मध्ये पाण्याखालील प्रसूती

नाशिक । अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल मधील तज्ज्ञा डॉक्टरांनी गर्भवती महिलांसाठी आधुनिक प्रसूती तंत्रज्ञानाचा अवलंब करतांना प्रसूती व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. श्रद्धा सबनीस यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी पाण्याखालील प्रसूती (अंडरवॉटर डिलीव्हरी) केली आहे. पाण्याखालील डिलीव्हरी ही एक आधुनिक तंत्र आहे, जी जगभर लोकप्रिय आहे. या प्रक्रियेमुळे प्रसूतीदरम्यान होणाऱ्या वेदना कमी होतात, मानसिक ताण हलका होतो आणि मातेसाठी अधिक आरामदायक अनुभव मिळतो. ही प्रक्रिया आमच्या हॉस्पिटलच्या वचनबद्धतेचे आणि नवकल्पनांचे प्रतीक असल्याचे डॉ.श्रद्धा सबनीस यांनी सांगितले. मेडिकल डायरेक्टर डॉ. सुशील पराख व सेंटर हेड अनूप त्रिपाठी यांनी अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल्स आणि उत्तर महाराष्ट्रासाठी या महत्त्वपूर्ण टप्प्याबद्दल अभिमान व्यक्त केला.

सपकाळ व्यवस्थापन महाविद्यालयाची कार्यशाळा

नाशिक । अंजनेरी येथील के.आर. सापकाळ कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज्च्या वतीने 'लैंगिक छळ प्रतिबंध जागरुकता' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात सुप्रसिद्ध विधिज्ञ व तज्ज्ञ वक्त्या डॉ.मनीषा भामरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. संचालिका डॉ.आरती मोरे यांनी स्वागत केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रवींद्र सपकाळ व कल्याणी सापकाळ यांचे मार्गदर्शन लाभले. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. बागल, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. बच्छाव सर प्राचार्या डॉ.डी.जी.फडतरे मॅडम यांचे कार्यक्रमास सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. सुनेत्रा जैन, डॉ. हरीष पद्मनाभन, प्रा. अजित वाघ, प्रा. वैशाली तांबे, प्रा.ममता काकडे, शिक्षकेत्तर सेवक यांनी परिश्रम घेतले.

शपथविधीवर बहिष्कार

(पान १ वरून) करत आघाडीने निवडणूक निकालावर संशय व्यक्त केला आहे. याचे पडसाद आजपासून सुरु झालेल्या विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात उमटले. आज महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानसभा सदस्त्वाची शपथ घेतली नाही. तर हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी माजी विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांचे नाव शपथ घेण्यासाठी पुकारल्यानंतर आघाडीचे आमदार उठून सभागृहाच्या बाहेर गेले.

महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून विधानभवनाच्या पायऱ्यांवर उभे राहून ईव्हीएमविरोधी बॅनर फडकावले. आघाडीचे नेते आदित्य ठाकरे, नाना पटोले, विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड या आंदोलनात सहभागी झाले होते. एखादे सरकार एवढ्या मतांनी निवडून येत असताना राज्यात कुठेही जल्लोष पाहायला मिळत नाही. मग प्रश्न हाच पडतो की हे जनतेने दिलेले बहुमत आहे की ईव्हीएम-निवडणूक आयोगाने दिलेले बहुमत आहे. तेव्हा मारकडवाडीतील लोकांनी चाचणी मतदान मागितले तेव्हा ते होऊ दिले नाही. त्यामुळे आम्ही जनतेचा मान राखून आज शपथ घेणार नाही. उद्या आम्ही शपथ घेणार आहोत, असे आदित्य ठाकरे यांनी सांगितले. तर विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आले असले तरी आपल्या मतदानाने हे सरकार आलेले नाही अशी जनतेची भावना आहे. हे सरकार जनतेच्या मताचे वाटत नाही. मारकडवाडीच्या लोकांची जी भावना आहे तीच राज्यातील बहुतांश जनतेची भावना आहे. त्यामुळे जनभावनेचा आदर करत आज आघाडीच्या आमदारांनी शपथ न घेण्याचा निर्णय घेतल्याचे नाना पटोले म्हणाले.

विधानसभा निवडणुकीत आम्ही निवडून आलो असलो तरी आम्ही आज शपथ घेणार नाही. या निकालावर महाराष्ट्राचा विश्वास बसत नाही. मारकडवाडीने मतपत्रिकेवर चाचणी मतदान घेण्याचा निर्णय घेतला होता. यात निवडणूक आयोगाचा काय संबंध आहे? पोलिसांचा काय संबंध आहे? गावाने एखादा निर्णय घेतला तरी राज्य सरकार त्यावर वरवंटा फिरवण्याचे काम करत आहे. हे सरकार लोकशाही पद्धतीने आलेले नाही, अशी टीका करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जितेंद्र आव्हाड यांनी निवडणूक प्रक्रियेवर संशय व्यक्त केला. तर आमचा शपथेला विरोध नाही. या सरकारला पाशवी म्हणजे जवळपास ९० टक्के बहुमत मिळाले आहे. हे या देशात यापूर्वी कधी घडले नाही. ही जादू ईव्हीएमची आहे. त्यामुळे सरकारचा निषेध करुन आज शपथ न घेण्याचा निर्णय आम्ही घेतल्याचे शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी सांगितले. या सरकारला मिळालेले पाशवी बहुमत हा जनतेचा जनाधार नाही, ती ईव्हीएमची किमया आहे, अशी टीकाही त्यांनी केली. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार छगन भुजबळ विरोधी आमदारांच्या शपथ न घेण्याच्या भूमिकेवर आपली प्रतिक्रिया दिली. मी १९८५ पासून आमदार आहे. यापूर्वी असे काही घडल्याचे मला आठवत नाही. या आमदारांना उद्या शपथ घ्यावीच लागेल. जर उद्या शपथ घेतली नाही तर विधानसभा अध्यक्षांच्या निवडीनंतर त्यांच्या दालनात जाऊन या आमदारांना शपथ घ्यावी लागेल. या आमदारांना सभागृहाच्या कामकाजात भाग घ्यायचा असेल तर त्यांना शपथ घ्यावीच लागेल, असे भुजबळ म्हणाले.

महाविकास आघाडीचा रडीचा डाव : अजित पवार

महायुतीला मोठे बहुमत मिळाल्याने आता महाविकास आघाडी ईव्हीएमचा विषय काढून रडीचा डाव खेळत आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाविकास आघाडीच्या आज शपथ न घेण्याच्या निर्णयावर टीका केली. आम्हीही महाविकास आघाडीमध्ये काम केले आहे. त्यामुळे ईव्हीएम मशीनला दोष देण्यात काहीच अर्थ नाही. लोकसभेला ईव्हीएमने ३१ जागा महाविकास आघाडीला दिल्या, त्यावेळी ईव्हीएम मशीन खूप चांगली होती. मात्र विधानसभेत महायुतीच्या बाजुने जनतेने कौल दिला तर ईव्हीएमला दोष द्यायला आघाडीने सुरुवात केली आहे. महाविकास आघाडीच्या आमदारांना शपथ घेण्याचा उद्याचा दिवस आहे. त्यांना उद्या संध्याकाळपर्यंत शपथ घ्यावी लागेल. तरच त्यांना सोमवारी कामकाजात भाग घेता येणार आहे, असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.

अबू आझमी, निकोले यांनी घेतली शपथ

ईव्हीएमच्या मुद्यावर महाविकास आघाडीच्या आमदारांनी आज शपथ घेण्यास नकार दिला. मात्र, महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या समाजवादी पक्षाच्या अबू आझमी, रईस शेख आणि माकपच्या विनोद निकोले यांनी आज विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. त्यामुळे अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आघाडीत समन्वय नसल्याचे स्पष्ट झाले. समाजवादी पक्षाच्या आमदारांनी शपथ घेतल्यामुळे महाविकास आघाडीत फूट पडल्याची चर्चा विधानभवनात होती. मात्र, अबू आझमी यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना आपण महाविकास आघाडीपासून दूर गेलो नसल्याचे स्पष्ट केले.

१७३ आमदार शपथबद्ध

(पान १ वरून) आज अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सत्ताधारी महायुतीचे आमदार प्रचंड उत्साहात होते. शिवसेना शिंदे गटाचे आमदार भगवा फेटा तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे आमदार गुलाबी फेटा घालून विधानसभा सभागृहात दाखल झाले. आज सकाळी ११ वाजता हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी स्थान ग्रहण करताच राष्ट्रगीत आणि राज्यगीताने अधिवेशनाला सुरुवात झाली. कोळंबकर यांनी राज्यपालांकडून आलेला आदेश वाचून दाखवल्यानंतर अधिवेशनाच्या कामकाजाला सुरुवात झाली.

सुरुवातीला कोळंबकर यांनी तालिका अध्यक्ष म्हणून भाजपचे चैनसुख संचेती, जयकुमार रावल, शिवसेना शिंदे गटाचे आशिष जयस्वाल, अजित पवार गटाचे माणिकराव कोकाटे यांची निवड जाहीर केली. त्यामुळे या चार जणांना सर्वप्रथम विधानसभा सदस्यत्वाची शपथ देण्यात आली. या चौघांनी मराठीतून शपथ घेतली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शपथ घेतली. शिंदे यांनी शपथ घेताना बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचे स्मरण केले. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री शपथ घेत असताना सत्ताधारी बाकावरील सदस्यांनी बाके वाजवून स्वागत केले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, जय श्रीराम अशा घोषणा देण्यात आल्या.

विधानसभेचे माजी अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी शपथ घेतल्यानंतर नाना पटोले यांचे नाव पुकारण्यात आले. त्यावेळी शपथ न घेता महाविकास आघाडीचे सदस्य सभागृहाबाहेर पडले. ईव्हीएमचा मुद्दा उपस्थित करत विरोधी पक्षाच्या आमदारांनी आज शपथ न घेण्याचा निर्णय जाहीर केला. त्यामुळे शपथविधीसाठी सहकुटुंब आलेल्या काही काँग्रेस आमदारांचा हिरमोड झाला.

वळसे पाटील यांच्यानंतर विधानसभेचे माजी अध्यक्ष राहुल नार्वेकर,माजी उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, डॉ. विजयकुमार गावित, गिरीश महाजन, गणेश नाईक, हसन मुश्रीफ, बबनराव लोणीकर, संजय कुटे, सुरेश खाडे, गुलाबराव पाटील, दादाजी भुसे, संजय राठोड, उदय सामंत, धर्मरावबाबा आत्राम, संभाजी पाटील निलंगेकर, दीपक केसरकर, शंभूराज देसाई, रवींद्र चव्हाण, राजकुमार बडोले, आशिष शेलार, अतुल सावे, चंद्रकांतदादा पाटील, धनंजय मुंडे, आदिती तटकरे, माधुरी मिसाळ, सुलभा खोडके, मंदा म्हात्रे, मनीषा चौधरी, देवयानी फरांदे, मोनिका राजळे यांच्यासह १७३ जणांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर सदस्यांनी नोंदवहीत सही करून हंगामी अध्यक्षांशी हस्तांदोलन करत सभागृहात स्थानापन्न झाले.

भाजपच्या गिरीश महाजन, सीमा हिरे, प्रशांत ठाकूर, सुधीर गाडगीळ, नितेश राणे, प्रताप अडसड, राम कदम यांनी संस्कृतमधून, समाजवादी पक्षाचे अबू आझमी, एमआयएमच्या मुफ्ती महम्मद इस्माईल यांनी हिंदीतून तर भाजपच्या कुमार आयलानी यांनी सिंधीतून शपथ घेतली. समाजवादी पक्षाच्या रईस शेख यांच्यासह सर्व सदस्यांनी मराठीतून शपथ घेतली. काही आमदारांनी शपथ घेताना छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे यांचे आवर्जून स्मरण केले.

शब्दकोडे : १२७



आडवे शब्द : १) एकुण एक, सर्व. ३) खग. ५) साप. ७) निरोप्या, हलकारी. ९) अतिशय श्रीमंत माणूस. ११) हादरा, टक्कर, १२) निरुपाय झालेला. १३) अरण्य. १४) फोफावणे, मत्त होणे. १५) किंचित कडू चव. १७) पावसाची झड. १८) उत्सवाचे दिवस. १९) व्यवस्थित, शीर **** ते पगडी पचास. २०) ओटा, कट्टा. २२) कोळिष्टकावरील कचरा. २३) मालाचे येणे-जाणे. २५) हिस्सा, वाटा. २७) गोंगाट, ध्वनी. २९) पांढरा भित्रा प्राणी. ३०) नवरदेव. ३१) श्रीमंत. ३३) कलाकार (हिंदी). ३५) सोन्याचा धागा. ३७) पैसेवाला, श्रीमंत. ३८) रममाण, एकरूप. ४०) मित्र. ४२) दरोडा. ४३) रक्षण. ४४) रात्र. ४५) पाठविलेला. ४८) कोर्टातील खटला. ४९) अंधार, काळोख. ५२) आशीर्वाद. ५४) सरकारी जमिनीची व्यवस्था पाहणारा अधिकारी. ५६) शिव्याशाप. ५८) कार्य, काज. ५९) साहित्यातील पोवाड्याचा रस. ६१) चटकन. ६४) सोन्याची नाजूक साखळी. ६५) शूर. पराक्रमी. ६६) देखत, च्या समोर.

उभेशब्द : १) सगळ्या धर्मातील लोकांना सारखी वागणूक. २) च्या साठी. ३) माघारी येणे. ४) गप्प बसण्याचे व्रत. ५) विविध. ६) घेराव, लोकांचा विळखा. ७) माहितगार. ८) लंकेचा दैत्य राजा. ९) चिवचिवाट, गोंधळ. १०) लाकूड कापण्याचे हत्यार. १२) तत्काळ योग्य उत्तर देणारा. १४) खवा. १६) मोठा नगारा. १७) भागीदार. १९) सर्वांना सारखे प्रमाण. २०) एक चतुर्थांश भाग. २१) फुरसत. २३) चालू दिवस. २४) कशा प्रकारचा?. २६) अक्कल नसलेला गरजू. २७) देवाण-घेवाण. २८) प्रहार, घाव. ३२) सत्ता. ३३) कोणीतरी एक, परका. ३४) बैलाच्या शिंगाना बांधण्याचा दोर. ३६) एक उबदार पांघरूण (इं.) ३८) अंगणात पाणी शिंपडणे३९) मजबूत, दणकट. ४०) निष्णात. ४१) कोवळा अंकुर. ४६) छोटे वादळ. ४७) महिला, स्त्री. ५०) ढाक्क्याचे प्रसिद्ध कापड. ५१) भूतकाळ. ५३) दानशूर. ५५) जळजळीत, अतिउष्ण. ५७) उत्तराधिकारी. ६०) विषमच्या विरुद्ध. ६२) शाळेतील शिक्षणाची खोली. ६३) सडक, मार्ग.

शब्दकोड१२६चे उत्तर

नं	द	न	व	न	■	न	ग	■	खा	ज	गी	■	फि	■
द	र	वा	जा	■	न	ग	र	पा	ल	■	त	प	की	र
न	ड	■	वा	चा	वी	र	■	ळ	■	बो	का	■	र	सा
■	■	बा	की	■	न	■	आ	त	डे	■	र	वा	■	त
न	व	ल	■	दि	■	श	व	■	व	र	■	र	म	ल
ज	न	क	ज	न	नी	■	र	म	रा	ट	■	क	ळ	■
रा	■	■	ब	■	रां	ज	ण	■	■	र	ब	री	■	क
न	ख	भ	र	■	ज	ल	■	ट	क	ट	क	■	■	ळ
ज	■	र	■	त	न	या	■	म	■	■	री	त	भा	त
र	म	ता	रा	म	■	न	व	ट	के	■	■	ग	ग	न
■	स	ड	■	स	दा	■	■	म	■	न	का	र	■	क
सा	ल	■	रा	■	स	मा	धा	न	का	र	क	■	न	ळ
रा	त	रा	णी	■	■	शी	■	ग	ळ	का	■	स	व	त
सा	■	ग	व	ग	वा	■	बा	री	■	सु	धा	क	र	■
र	जा	■	सा	र	स	बा	ग	■	सा	र	■	ल	स	णी